भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

# पोलीस (अप्रीतीची भावना चेतवणे) अधिनियम, १९२२

**(सन १९२२ चा अधिनियम क्रमांक २२)**

[१ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान]

# The Police (Incitement to Disaffection) Act, 1922

## (Act No. 22 of 1922)

[*As in force on the 1st March 1989*]

[महाराष्ट्र विशोधनांसहित]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
१९९१

[किंमत : रु. १.२०]

# प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च, १९८९ रोजी यथाविद्यमान असलेला दि पोलीस (अिनसाइटमेन्ट टू डिसअफेक्शन) अॅक्ट, १९२२ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ भारताचे राजपत्र, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १, अंक १, दिनांक ९ जुलै, १९९० यात पृष्ठ ४६ ते ४८ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ जुलै, १९९०.

व्ही. एस. रमादेवी,
सचिव, भारत सरकार.

---

# PREFACE

This edition of The Police (Incitement to Disaffection) Act, 1922 as on the 1st March 1989 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India,* Extraordinary, Part XII, Section 1, No. 1, Vol. 1, dated 9th July 1990 on pages 46 to 48.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi, 9th July 1990.

V. S. RAMADEVI,
Secretary to the Government of India.

एच ४७९६ (८३४—७—९१)

## विशोधन अधिनियम आणि अनुकूलन आदेश यांची सूची

१. भारत सरकार (भारतीय नियमांचे अनुकूलन) आदेश, १९३७.

२. भारतीय स्वातंत्र्य (केंद्रीय अधिनियम आणि अध्यादेश यांचे अनुकूलन) आदेश, १९४८.

३. विधि अनुकूलन आदेश, १९५०.

४. विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६.

## महाराष्ट्र सुधारणा अधिनियम

१. पोलीस (अप्रीतीची भावना चेतवणे) (मुंबई विस्तार आणि सुधारणा) अधिनियम, १९५८ (१९५८ चा सत्याहत्तर).

२. पोलीस (अप्रीतीची भावना चेतवणे) (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम, १९८३ (१९८३ चा तेवीस).

# पोलीस (अप्रीतीची भावना चेतवणे) अधिनियम, १९२२

## (१९२२ चा अधिनियम क्रमांक २२)

(दिनांक १ मार्च, १९८९ रोजी यथाविद्यमान)

[५ ऑक्टोबर, १९२२]

**पोलिसांमध्ये अप्रीतीची भावना पसरवणे व सजातीय अपराध यांबद्दल शिक्षेचा उपबंध करण्यासाठी अधिनियम**

ज्याअर्थी, पोलिसांमध्ये अप्रीतीची भावना पसरवणे व सजातीय अपराध यांबद्दल शिक्षा करणे समयोचित आहे; त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियमित करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

१. (१) या अधिनियमास "पोलीस (अप्रीतीची भावना चेतवणे) अधिनियम, १९२२" असे म्हणता येईल.

[1][(२) [2][१ नोव्हेंबर, १९५६ च्या लगतपूर्वी भाग 'ख' राज्यामध्ये समाविष्ट असलेली क्षेत्रे खेरीजकरून] संपूर्ण भारतभर त्याचा विस्तार आहे.]

(३) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे निदेशित करील अशा [3]दिनांकापासून कोणत्याही राज्यात किंवा त्याच्या भागात तो अंमलात येईल.

**व्याख्या.**

२. या अधिनियमात "पोलीस दलातील व्यक्ती" या शब्दप्रयोगाचा अर्थ, अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिनियमितीखालील सुव्यवस्था रक्षणाची कामे पार पाडण्यासाठी नियुक्त केलेली किंवा सेवेत भरती केलेली व्यक्ती असा आहे.

३. जो कोणीही [4]* * * [5][भारतात] कायद्याद्वारे प्रस्थापित झालेल्या शासनाच्या विरुद्ध पोलीस दलातील व्यक्तींमध्ये उद्देशपूर्वक अप्रीतीची भावना निर्माण करील किंवा तशी भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्या कोणत्याही कृतीमुळे अप्रीतीची भावना निर्माण होण्याची शक्यता आहे हे स्वतःला माहीत असूनही तशी कृती करील अथवा पोलीस दलातील कोणत्याही व्यक्तीला तिने आपली कामगिरी थांबवून ठेवावी म्हणून किंवा तिने शिस्तभंग करावा म्हणून प्रवृत्त करील किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्या कोणत्याही कृतीमुळे ती व्यक्ती तशी प्रवृत्त होण्याची शक्यता आहे हे स्वतःला माहीत असूनही तशी कृती करील तो, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास, किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

**अप्रीतीची भावना निर्माण करणे इत्यादींबद्दल शिक्षा.**

**३. [1][(१)] जो कोणीही भारतात कायद्याद्वारे प्रस्थापित झालेल्या शासनाच्या विरुद्ध पोलीस दलातील व्यक्तींमध्ये उद्देशपूर्वक अप्रीतीची भावना निर्माण करील किंवा तशी भावना निर्माण करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्या कोणत्याही कृतीमुळे अप्रीतीची भावना निर्माण होण्याची शक्यता आहे हे स्वतःला माहीत असूनही तशी कृती करील अथवा पोलीस दलातील कोणत्याही व्यक्तीला तिने आपली कामगिरी थांबवून ठेवावी म्हणून किंवा तिने शिस्तभंग करावा म्हणून प्रवृत्त करील किंवा प्रवृत्त करण्याचा प्रयत्न करील किंवा ज्या कोणत्याही कृतीमुळे ती व्यक्ती तशा प्रवृत्त होण्याची शक्यता आहे हे स्वतःला माहीत असूनही तशी कृती करील [2][तो दोषसिद्धिअंती, तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासास, किंवा पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास, किंवा या दोन्ही शिक्षास पात्र ठरेल ;**

---

१. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे दाखल केले.

२. विधि अनुकूलन (क्रमांक ३) आदेश, १९५६ द्वारे "भाग 'ख' राज्ये" या मजकुराऐवजी दाखल केले.

३. हा अधिनियम २५ जानेवारी, १९२३ पासून आसाममध्ये अंमलात आला—पहा, आसामचे राजपत्र (इंग्रजी), १९२३, भाग दोन, पृष्ठ ११३ ; १३ मार्च, १९३० पासून पंजाबमध्ये अंमलात आला—पहा, पंजाबचे राजपत्र, १९३०, भाग १, पृष्ठ ३४२ ; १५ मे, १९३० पासून बंगाल आणि उडीसामध्ये (संथाल परगण्यासह) अंमलात आला, पहा, बंगाल आणि उडीसाचे राजपत्र, असाधारण, दिनांक १३ मे, १९३० ; आणि ५ जून, १९३० पासून मुंबई (प्रेसिडन्सी) इलाख्यामध्ये अंमलात आला, पहा, मुंबईचे राजपत्र (इंग्रजी) ; भाग एक, पृष्ठ १३९४. ह्या अधिनियमास 'खोण्डमाळ विधि विनियम, १९३६' (१९३६ चा ४) याच्या कलम ३ व अनुसूचीद्वारे खोण्डमाळ जिल्ह्यात आणि 'आंगुल विधि विनियम, १९३६' (१९३६ चा ५) याच्या कलम ३ व अनुसूचीद्वारे आंगुल जिल्ह्यात अंमलात आला असल्याचे घोषित केले.

१९६४ चा अधिनियम क्रमांक २० च्या अनुसूची २ द्वारे पश्चिम खानदेशच्या शहादा, नंदूरबार या जिल्ह्यांवर आणि तळोदा तालुक्यावर, मुंबई राज्याच्या पंचमहाल जिल्ह्यांचा दोहद तालुका आणि जालोद महाल यांवर ह्या अधिनियमाचा विस्तार केला.

४. विधि अनुकूलन आदेश, १९५० द्वारे "हिज मॅजेस्टी" हे शब्द गाळले.

५. अनुकूलन आदेश, १९४८ द्वारे "ब्रिटिश भारत किंवा ब्रिटिश बर्मा" याऐवजी दाखल केले. अनुकूलन आदेश, १९३७, द्वारे "किंवा ब्रिटिश बर्मा" हे शब्द समाविष्ट केले.

**१. १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३— कलम २ द्वारे कलम ३ ला त्याचे पोटकलम (१) म्हणून नवीन क्रमांक दिला व पोटकलम (२) जादा दाखल केले.**

**२. १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३— कलम २ द्वारे समाविष्ट केले.**

परंतु, याविरुद्ध अशा विशेष व पर्याप्त कारणांच्या अभावी असा कारावास सहा महिन्यांपेक्षा कमी असणार नाही व असा द्रव्यदंड पाचशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही. तशी कारणे असल्यास ती न्यायालयाच्या न्याय निर्णयात नमूद करावी लागतील.]

[1][(२) या अधिनियमाखालील सर्व अपराध दखलपात्र व बिनजामिनी असतील.]

**स्पष्टीकरण.**—शासनाने केलेल्या उपाययोजनांमध्ये कायदेशीर मार्गाने बदल घडवून आणण्याच्या हेतूने नापसंतीदर्शक अभिप्राय अथवा शासनाच्या प्रशासकीय किंवा अन्य कार्यवाहीबाबत नापसंतीदर्शक अभिप्राय व्यक्त करणे हा या कलमाखाली अपराध ठरत नाही—मात्र त्या अभिप्रायामुळे अप्रीतीची भावना निर्माण होऊ नये किंवा ती निर्माण व्हावी या उद्देशाने ते अभिप्राय व्यक्त केलेले नसावेत किंवा त्यामुळे तशी भावना निर्माण होण्याची शक्यता नसावी.

विवक्षित प्रयोजनासाठी पोलीस संघ व अन्य व्यक्ती यांनी केलेल्या कृतींची व्यावृत्ती.

४. एखादी गोष्ट सद्भावपूर्वक केलेली असून—

(क) पोलीस दलातील एखाद्या व्यक्तीच्या कल्याणासाठी किंवा तिच्या हितासाठी तिला आपली कामगिरी कायद्याद्वारे प्राधिकृत असलेल्या कोणत्याही रीतीने थांबवून ठेवण्यास प्रवृत्त करणारी असेल तर; किंवा

(ख) पोलीस दलातील व्यक्ती म्हणून त्यांचे हितवर्धन करण्यासाठी स्थापन केलेल्या कोणत्याही संघास शासनाने प्राधिकृत केले असून किंवा त्याला मान्यता दिली असून, शासनाने संमत केलेल्या कोणत्याही नियमांन्वये किंवा संस्थापन नियमावलीअन्वये संघाने किंवा संघाच्या वतीने ती गोष्ट केली असेल तर,

अशी कोणतीही गोष्ट त्या कलमाखाली अपराध असल्याचे मानले जाणार नाही.

दुय्यम न्यायालयांनी संपरीक्षा करण्यास मंजुरी.

५. कोणत्याही न्यायालयाला, जिल्हा दंडाधिकाऱ्याकडून किंवा इलाखा शहराच्या [1]* * * बाबतीत पोलीस आयुक्ताच्या पूर्वमंजुरीखेरीज किंवा त्याच्याकडून तक्रार आल्याखेरीज, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करण्याची कार्यवाही करता येणार नाही.

प्रकरणांची संपरीक्षा.

६. (१) इलाखा शहर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथम वर्ग दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असणाऱ्या कोणत्याही न्यायालयाला या अधिनियमाखालील अपराधाची संपरीक्षा करता येणार नाही.

(२) 'फौजदारी प्रक्रिया संहिता १८९८' (१८९८ चा ५)* यामधील २२ व्या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संक्षिप्तरीत्या संपरीक्षा केली जाणार नाही.

५. कोणत्याही न्यायालयाला, जिल्हा दंडाधिकाऱ्याकडून किंवा इलाखा शहराच्या [2]* * * बाबतीत पोलीस आयुक्तांच्या पूर्वमंजुरीखेरीज [2]* * * या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करण्याची कार्यवाही करता येणार नाही.

[3][६. (१) महानगर दंडाधिकाऱ्याच्या किंवा प्रथमवर्ग न्यायदंडाधिकाऱ्याच्या न्यायालयापेक्षा कनिष्ठ असणाऱ्या कोणत्याही न्यायालयाला या अधिनियमाखालील अपराधाची संपरीक्षा करता येणार नाही.

(२) 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही महानगर दंडाधिकारी किंवा कोणत्याही प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी त्याला, योग्य वाटल्यास, या अधिनियमाखालील सर्व अपराधांची किंवा त्यांपैकी कोणत्याही अपराधाची संक्षिप्तरीत्या संपरीक्षा करू शकेल आणि उक्त संहितेतील कलमे २६२ ते २६५ (दोन्ही धरून) यांचे उपबंध, शक्य होईल तितपत अशा संपरीक्षेस लागू होतील :

परंतु, जेव्हा कोणत्याही प्रकरणाची संक्षिप्तरीत्या संपरीक्षा केलेली असेल आणि या अधिनियमान्वये आरोपीस सिद्धदोष ठरविले गेले असेल तेव्हा, संबंधित दंडाधिकारी तीन महिन्यांपेक्षा अधिक मुदतीच्या कारावासाची शिक्षा ठोठावणार नाही आणि या अधिनियमान्वये किमान रकमेचा द्रव्यदंड देण्यासंबंधीचा उपबंध लागू होणार नाही.]

---

१. अनुकूलन आदेश, १९३७ द्वारा "किंवा रंगून शहर" हे शब्द गाळले आहेत

* आता, 'फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३' (१९७४ चा २)—प्रकरण २१ वे पहा.

१. १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३—कलम २ द्वारे कलम ३ ला त्याचे पोटकलम (१) म्हणून नवीन क्रमांक दिला व पोटकलम (२) जादा दाखल केले.

२. १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३-कलम ३ द्वारे गाळले.

३. वरील अधिनियमाच्या कलम ४ द्वारे मूळ पोटकलम (६) ऐवजी दाखल केले.